# प्रकरण १ ले
# लोकसंख्या भूगोलचा परिचय (Introduction to Population Geography)

१.१ लोकसंख्या भूगोलाची व्याख्या

१.२ लोकसंख्या भूगोलचे स्वरूप आणि व्याप्ती

१.३ लोकसंख्या भूगोलाचे महत्त्व

१.४ लोकसंख्या माहितीचे/सामग्रीचे स्रोत

**प्रास्ताविक:**

भूगोलाला सर्व शास्त्रांचे शास्त्र व जननी म्हटले जाते. भूगोल (Geography) हा शब्द सर्वप्रथम इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात ग्रीक तत्त्ववेता **Eratosthenes** यांनी वापरला. भूगोल म्हणजे पृथ्वीचे वर्णन होय ही व्याख्या प्रारंभिक अवस्थेत करण्यात आली नंतर भूगोल हे वितरणाचे शास्त्र आहे अशी व्याख्या करण्यात आली. सोळाव्या शतकात भूगोलाच्या अभ्यासात मानवाचा अंतर्भाव करण्यात आला त्यामुळे भूगोलाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत गेले. ही गुंतागुंत सोडविण्यासाठी भूगोलाच्या **प्राकृतिक भूगोल व मानवी भूगोल** अशा मुख्य दोन शाखा उदयास आल्या.

प्राकृतिक भूगोलामध्ये पृथ्वीवरील विविध प्राकृतिक व नैसर्गिक घटकांचा अभ्यास केला जातो. तर मानवी भूगोलामध्ये मानवनिर्मित घटकांचा अभ्यास केला जातो. काळाच्या ओघात भूगोल विषयाचा आवाका वाढत गेल्यामुळे प्रत्येक शाखेत विशेषीकरण घडून आले. प्राकृतिक भूगोल आणि मानवी भूगोल भूगोलाच्या उपशाखा निर्माण झाल्या. लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची अलीकडे विकसित झालेली एक महत्त्वाची उपशाखा उदयास आली. या शाखेत लोकसंख्येच्या प्रादेशिक विश्लेषणावर अधिक भर दिला जातो. लोकसंख्येच्या अभ्यासास प्राचीन कालावधी पासून महत्व आहे.

इ.स. 1953 मध्ये जी. टी. त्रिवार्था यांनी लोकसंख्या भूगोलाला एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून दर्जा प्राप्त करून दिला म्हणून **जी. टी. त्रिवार्था यांना लोकसंख्या भूगोलाचा जनक असे म्हणतात**. जगातील अनेक विद्यापीठांमध्ये या विषयाच्या अभ्यासाला सुरुवात झाली. त्रिवार्था, क्लार्क, गार्नियर, मेलेझिन,झेलिंस्की,माल्थस इत्यादी भूगोल तज्ञानी लोकसंख्या भूगोलाचा विकास घडवून आणला.

**१.१ लोकसंख्या भूगोलाची व्याख्या (Definition of Population Geography)**

लोकसंख्या म्हणजे एका विशिष्ट भूप्रदेशावर कायमची वस्ती करून राहणाऱ्या लोकांची संख्या होय. राष्ट्राच्या आर्थिक विकासाबरोबरच त्या राष्ट्राचे सार्वभौमत्व, संरक्षण तसेच शास्त्रीयदृष्ट्या राष्ट्राचा विकास घडवून आणण्यासाठी देशातील लोकसंख्या महत्त्वाची भूमिका बजावते. म्हणूनच लोकसंख्येला एक साधनसंपत्ती समजली जाते. लोकसंख्येमध्ये प्रादेशिक भिन्नता आढळते. प्रदेशानुसार मानवी समूहाचा विकास वेग-वेगळा झालेला दिसून येतो. अशा सर्व लोकसंख्याविषयक घटकांचा अभ्यास लोकसंख्या भूगोल केला जातो. लोकसंख्या भूगोलाच्या व्याख्या अनेक आहेत यातील काही महत्त्वाच्या व्याख्या पुढील प्रमाणे आहेत

१. **जी. टी. त्रिवार्था (G.T.Trewartha)** यांच्या मते, "विभिन्न भौगोलिक प्रदेशातील मानवी समूहाच्या वैशिष्ट्यांचे अध्ययन म्हणजे लोकसंख्या भूगोल होय."
२. **जे. आय. क्लार्क (J.I.Clarke)** यांच्या मते, "लोकसंख्या वितरण, संरचना, स्थलांतर, वाढ यांच्यातील अभिक्षेत्रीय विविधतेचा अभ्यास म्हणजे लोकसंख्या भूगोल होय."
३. **जे.बी. गार्नियर (J.B.Garnier)** यांच्या मते, "पर्यावरणाच्या उपलब्ध चौकटीत लोकसंख्येच्या घटकाचे विवेचन व भावी परिणाम यांचा अभ्यास म्हणजे लोकसंख्या भूगोल होय."

४. **मेलेझिन (Melezin)** यांच्या मते, "लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येचे गट व वस्त्यांचे जाळे त्यांचा एकसंगपणा व उपयोगिता आणि समाजाच्या ध्येयाची परिणामकारकता यांच्यातील संबंधाचा अभ्यास होय."

५. **विल्बर झेलिन्स्की ( Wilbur Zelinsky)** यांच्या मते, "एखाद्या प्रदेशातील भौगोलिक वैशिष्ट्यावर लोकसंख्येचा स्थल व कालपरत्वे बदल होतो. तसेच प्रदेशाच्या भौगोलिक स्वरूपाचा लोकसंख्येवर होणारा परिणाम अभ्यासणे म्हणजे लोकसंख्या भूगोल होय."

६. **प्रा. डी. आय. बैलेन्टी ( Prof.D.I.Bailenti)** यांच्या मते, "लोकसंख्या भूगोल लोकसंख्येची रचना, गतिशीलता आणि वितरण यांच्याशी संबंधित असून वरील भिन्नतेमुळे निर्माण झालेली प्रारूपे, मानवी वस्तीचे झालेले क्षेत्रीय संघटन, या क्षेत्रीय संघटनांमधून आढळणाऱ्या विकास प्रारूपाचे अध्ययन लोकसंख्या भूगोलात केले जाते."

७. **एडवर्ड अकरमन** यांच्या मते, "लोकांच्या प्रगतीसाठी निरनिराळया प्रदेशातील लोकांची भिन्नता वर्गीकरण व प्रकार इत्यादीची प्रदेशानुसार माहिती समजावून घेणे म्हणजे लोकसंख्या भूगोल होय."

थोडक्यात लोकसंख्या भूगोलात लोकसंख्येचे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वितरण, लोकसंख्येची वैशिष्ट्ये आणि भौगोलिक प्रदेशाशी असलेला संबंध यांचा सखोल अभ्यास केला जातो.

वरील भूगोल तज्ञाच्या लोकसंख्या भूगोलाच्या व्याख्या पाहिल्यानंतर आपणास असे लक्षात येते की लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येच्या प्रादेशिक विश्लेषणाचा अभ्यास असून यामध्ये लोकसंख्येच्या विविध अंगावर त्या प्रदेशातील भौगोलिक पार्श्वभूमीने केलेला परिणाम व त्या प्रदेशातील लोकांनी सभोवतालच्या भौगोलिक परिस्थितीशी केलेले समायोजन यांचा अंतर्भाव होत असतो.

## १.२ लोकसंख्या भूगोलचे स्वरूप आणि व्याप्ती (Nature and Scope of Population Geography)

**लोकसंख्या भूगोलाचे स्वरूप (Nature of Population Geography)**

लोकसंख्या भूगोलात मानवी लोकसंख्या हा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. ही लोकसंख्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर कमी-जास्त प्रमाणात सर्व ठिकाणी आढळते. फक्त याचे स्वरुप वेगवेगळे आहे. लोकसंख्या भूगोलाचे स्वरूप सुरुवातीच्या कालावधीपासून आत्तापर्यंत बदलत आहे त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे

1.भौगोलिक स्वरूप

2.आर्थिक स्वरूप

3.संख्यात्मक स्वरूप

4.तुलनात्मक स्वरूप

5.गतिशील किंवा परिवर्तनशील स्वरूप

**1. भौगोलिक स्वरूप (Geographical Nature)**

लोकसंख्या म्हटलं का तेथील भौगोलिक परिस्थितीचा परिणाम लोकसंख्येच्या वितरणावर झालेला दिसून येतो. भौगोलिक घटकांमध्ये भूरचना, हवामान, जमीन, साधनसंपत्ती, पाणीपुरवठा घटक येतात. भौगोलिक घटक ज्या प्रदेशामध्ये अनूकूल आहेत अशा ठिकाणी लोकसंख्येची घनता जास्त असते भौगोलिक घटक ज्या प्रदेशामध्ये प्रतिकूल आहेत अशा प्रदेशांमध्ये लोकसंख्येची घनता विरळ असते. त्यामुळेच लोकसंख्येचा अभ्यास करत असताना भौगोलिक घटकांना महत्त्व आलेले आहे. म्हणूनच प्राचीन कालावधीमध्ये लोकसंख्येच्या अभ्यासाची स्वरूप हे भौगोलिक स्वरूप प्राप्त झाले होते.

**२. आर्थिक स्वरूप (Economic Nature)**

मानवाला अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी काही ना काही आर्थिक स्रोत असणे गरजेचे आहे ज्या ठिकाणी आर्थिक स्रोत आहेत अशा ठिकाणी लोकसंख्या जास्त असते व ज्या ठिकाणी आर्थिक स्रोत कमी आहेत अशा प्रदेशांमध्ये लोकसंख्येची घनता कमी आढळते. यामुळेच लोकसंख्या भूगोलाचे स्वरूप हे आर्थिक स्वरूप बनलेले आहे.

**३. संख्यात्मक स्वरूप (Statistical Nature)**

लोकसंख्येचा अभ्यास संख्यात्मक आकडेवारी शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. कोणत्याही देशाची लोकसंख्या किती आहे त्यावर त्या देशाचा विकास अवलंबून असतो लोकसंख्या आणि साधनसंपत्ती यांचा अभ्यास करूनच तो देश आपला विकास करतो. त्यामुळे सर्व देशांमध्ये जनगणना करून लोकसंख्येची आकडेवारी गोळा केली जाते. या लोकसंख्येच्या आकडेवारीवरून प्रत्येक देशातील लोकसंख्येचा गुणात्मक व संख्यात्मक अभ्यास केला जातो. फक्त संख्यात्मक अभ्यास न करता गुणात्मक अभ्यास करणे सुद्धा गरजेचे आहे. जसे की कोणत्याही देशात त्या देशाची साक्षरता किती आहे त्याच्यावरती त्या देशाचा विकास अवलंबून असतो म्हणून फक्त संख्याही महत्त्वाची नसून तेथील गुणात्मक विकास सुद्धा महत्त्वाचा असतो म्हणूनच लोकसंख्या भूगोलाचे स्वरूप हे संख्यात्मक बनलेले आहे.

**४. तुलनात्मक स्वरूप (Comparative Nature)**

लोकसंख्येच्या वितरणावर भौगोलिक घटकांबरोबरच सामाजिक, आर्थिक, राजकीय घटकांचाही परिणाम झालेला आहे. त्यामुळे लोकसंख्येचे वितरण हे असमान आहे. वेगवेगळ्या प्रदेशानुसार लोकसंख्येचे वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत याचा तुलनात्मक अभ्यास लोकसंख्या भूगोलामध्ये केला जातो त्यामुळेच लोकसंख्या भूगोलाचे स्वरूप हे तुलनात्मक बनलेले आहे.

**५. गतिशील किंवा परिवर्तनशील स्वरूप (Dynamic Nature)**

**लोकसंख्या भूगोल हे गतिशील किंवा परिवर्तनशील शास्त्र आहे.** कारण लोकसंख्या भूगोलात लोकसंख्या हा घटक व त्यांची इतर अंगे (जन्म,मृत्यू, स्थलांतर, लोकसंख्यावाढ, लिंग गुणोत्तर, वयोगट, शिक्षण इत्यादी) स्थल व कालपरत्वे बदलणारे आहेत. तसेच लोकसंख्या या घटकावर परिणाम करणारे पर्यावरणातील नैसर्गिक व सांस्कृतिक घटक सुद्धा स्थल व कालपरत्वे बदलत असतात. म्हणजेच भूरचना, हवामान, मृदा, खनिजसंपत्ती, वनस्पती, प्राणी इत्यादी सारखे पर्यावरणातील घटक स्थिर नसून ते स्थल व कालपरत्वे बदलणारे असतात. याच बरोबर सांस्कृतिक पर्यावरणातील धर्म, वंश, भाषा, शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान इत्यादी घटकाचे स्वरूप ही स्थल-कालपरत्वे बदलत असते. लोकसंख्या भूगोलातील लोकसंख्या या घटकावर परिणाम करणारे नैसर्गिक व सांस्कृतिक घटक स्थल कालपरत्वे बदलणारे असल्यामुळे लोकसंख्या भूगोलाचे स्वरूप सुद्धा स्थल कालसापेक्ष असून ते गतिशील किंवा परिवर्तनशील स्वरूपाचे आहे.

लोकसंख्या भूगोलातील मानव हा भौगोलिक पर्यावरणातील एक महत्त्वपूर्ण **अभिकर्ता (Active Agent)** असून तो सांस्कृतिक भूदृश्याच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतो. भूगोल हे प्रादेशिक किंवा अभिक्षेत्रीय विविधतेचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. त्यामुळे प्रादेशिक किंवा अभिक्षेत्रीय विविधतेचे योग्य आकलन होण्यासाठी मानव या अभिकर्ता विषयी समग्र माहिती असणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून लोकसंख्या भूगोलाचे महत्त्व आपणास नजरेआड करता येणार नाही. या अभिकर्ता कडे असणारी क्षमता, कल्पकता, दूरदृष्टी,श्रम करण्याची प्रवृत्ती शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान इत्यादी गुणांमुळे तो आपल्या गरजेनुसा,र प्रसंगानुरूप व क्षमतेनुसार नैसर्गिक पर्यावरणामधील विविध घटकांचा वापर करून सांस्कृतिक दृश्याची निर्मिती करत असतो. याच कारणास्तव लोकसंख्या भूगोलाचे

महत्त्व **जी. टी. त्रिवार्था** येणे ओळखल्यामुळे लोकसंख्या भूगोल ही भूगोलाची नवीन शाखा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आली व तिचा उत्तरो उत्तर विकास होऊ लागला.

**लोकसंख्या भूगोलाची व्याप्ती (Scope of Population Geography)**

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक उपशाखा आहे. लोकसंख्या भूगोलामध्ये मानवी लोकसंख्येचा अभ्यास महत्वाचा आहे. या मानवी लोकसंख्येचे वितरण पृथ्वीच्या पृष्ठभागावर असमान आहे. लोकसंख्या गतिशील व परिवर्तनशील आहे. लोकसंख्येचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम आणि त्या प्रदेशाचा विकास हे देखील लोकसंख्येच्या अभ्यासातील एक महत्त्वाचा घटक आहे. लोकसंख्या भूगोलामध्ये त्याच्या विविध अगाचा स्थल व कालपरत्वे अभ्यास केला जातो. लोकसंख्या भूगोलाचा संबंध लोकसंख्या विषयक घटक नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणातील घटक यांच्याशी येत असल्यामुळे या विषयाची व्याप्ती मर्यादित न राहता व्यापक बनलेले आहे. भूगोल तज्ञाने लोकसंख्या भूगोलाची व्याप्ती पुढील घटकांचा अनुषंगाने सांगितली आहे.

**१. लोकसंख्येचे वितरण (Distribution of Population)**

लोकसंख्या वितरण म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील लोकसंख्येचे विभाजन होय. पृथ्वीवरील लोकसंख्येचे खंडवार, उप-खंडीय, देशपरत्वे, राज्यानुसार, प्रादेशिक व आंतर प्रादेशिक वितरण अभ्यासले जाते. लोकसंख्येच्या वितरणावर प्राकृतिक, नैसर्गिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांचा परिणाम होतो. अनुकूल भौगोलिक परिस्थिती असलेल्या नद्यांच्या खोऱ्यात व सुपीक मैदानी प्रदेशात लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले पहावयास मिळते तर प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे उष्ण व दमट हवामानाची काँगो, ॲमेझॉन नदीचे खोरे, विषुववृत्तीय वर्षावने, कोरड्या हवामानाची उष्ण वाळवंटे आणि शीत हवामानाचे प्रदेश, पर्वतीय प्रदेश, विरळ लोकवस्तीचे आहेत.

**२. लोकसंख्येची घनता (Density of Population)**

पृथ्वीच्या पृष्ठभागावर लोकसंख्येचे विषम वितरण पाहावयास मिळते. लोकसंख्येची घनता,घनतेचे विविध प्रकार, लोकसंख्येच्या घनतेवर परिणाम करणारे विविध घटक (प्राकृतिक, आर्थिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक) व त्याचे परिणाम अभ्यासले जातात.यावरूनच जगातील दाट घनतेचे प्रदेश, मध्यम घनतेचे प्रदेश, विरळ घनतेचे प्रदेश अशी विभागणी आढळून येते.

**3. लोकसंख्येचे स्थलांतर (Migration of Population)**

स्थलांतराचे प्रकार, स्थलांतराची कारणे व परिणाम, स्थलांतराविषयक नियम, स्थलांतराचा हेतू, कालावधी, आंतर व स्थलांतरावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास यामध्ये केला जातो. प्रत्येक देशाची स्थलांतराची धोरणे देखील भिन्न असतात. बुद्धीवहन व जागतिक स्थलांतर प्रवाह यांचादेखील अभ्यास महत्त्वपूर्ण असतो.

**४. लोकसंख्येची वाढ (Growth of Population)**

लोकसंख्येची वाढ प्रामुख्याने दोन कारणांनी होत असते पहिले कारण म्हणजे लोकसंख्येची नैसर्गिक वाढ जन्मदर जास्त व मृत्यू दर कमी असेल तर लोकसंख्येची नैसर्गिक वाढ होत असते. दुसरे कारण म्हणजे स्थलांतरामुळे आगमन प्रदेशात लोकसंख्येची वाढ होते. लोकसंख्या वाढीचा अभ्यास जन्मदर व मृत्युदर, कारणे, परिणाम तसेच लोकसंख्या विषयक सिद्धांत व लोकसंख्या विषयक प्रक्षेपण यांच्या आधारे केला जातो.

**५. लोकसंख्येची रचना (Composition of Population)**

लोकसंख्येच्या रचनेत वांशिक रचना, धार्मिक रचना, वयोगट व लिंग रचना व्यवसायिक रचना व अवलंबून भार, कार्यकारी लोकसंख्या, आर्थिक रचना, साक्षरता प्रमाण, वैवाहिक स्थिती, भाषिक रचना, राहणीमानाचा दर्जा यांचा सखोल अभ्यास केला जातो.

**६. साक्षरता व लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा (Literacy and Qualitative Standard of Population)**

यामध्ये जागतिक लोकसंख्येच्या साक्षरतेचे क्षेत्रीय प्रमाण, साक्षरता प्रसारासाठी उपाययोजना, गुणात्मक दर्जा व हा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न यांचा अभ्यास यामध्ये केला जातो.

**७. ग्रामीण व नागरी लोकसंख्या (Rural and Urban Population)**

ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण, नागरीकरणाची प्रक्रिया, अवस्था व जागतिक नागरीकरणाचा कल, नागरीकरणाच्या समस्या व उपाय यांचा अभ्यास यामध्ये केला जातो.

**८. लोकसंख्या व साधनसंपत्तीचे गुणोत्तर (Population and Resource Ratio)**

यामध्ये प्रदेशातील लोकसंख्या व उपलब्ध साधनसंपत्ती यांचे गुणोत्तर अभ्यासले जाते. यावरूनच लोकसंख्येच्या पर्याप्त लोकसंख्या, अतिरिक्त लोकसंख्या, न्यूनत्तम लोकसंख्या या संकल्पना अभ्यासल्या जातात. लोकसंख्येची वाढ व साधनसंपत्तीचा विकास, लोकसंख्येचा साधनसंपत्तीवरील ताण यांचा अभ्यास महत्वाचा आहे. साधनसंपत्तीच्या विकासावरूनच अविकसित, विकसनशील व विकसित देश असे वर्गीकरण केले जाते. साधनसंपत्ती व लोकसंख्या यांचे जागतिक आकृतिबंध. लोकसंख्या विषयक धोरणे यांचा सखोल अभ्यास लोकसंख्या भूगोलात केला जातो.

**९. जागतिक लोकसंख्या (World Population)**

जागतिक लोकसंख्या वाढ, लोकसंख्या प्रक्षेपण, स्थलांतर, जागतिक लोकसंख्येचे वितरण, लिंग व वयोगट रचना, सरासरी आयुर्मान, संख्यात्मक व गुणात्मक लोकसंख्या यांचा अभ्यास यामध्ये केला जातो.

थोडक्यात लोकसंख्या भूगोलाच्या व्याप्ती मध्ये मानवी लोकसंख्या, लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक, लोकसंख्येची घनता, लोकसंख्येच्या घनतेवर

परिणाम करणारे घटक, लोकसंख्येचे स्थलांतर, स्थलांतराचे प्रकार, स्थलांतराचा हेतू ,लोकसंख्या वाढ, जन्मदर, मृत्युदर, लोकसंख्येची संरचना, वांशिक रचना, धार्मिक रचना, वयोगट, लिंग रचना, साक्षरता, ग्रामीण नागरी लोकसंख्या, साधन संपत्ती व लोकसंख्या, लोकसंख्येचे गुणोत्तर, जागतिक लोकसंख्या आणि जागतिक लोकसंख्येचे परिणाम, राहणीमान, बेकारी, उत्पन्न, व्यवसाय, दारिद्र्य, भूकबळी, ,जात-धर्म, विवाह स्थिती, श्रमशक्ती, वंश इत्यादी घटकाचा अभ्यास केला जातो त्यामुळेच लोकसंख्या भूगोलाची व्याप्ती अतिशय व्यापक असलेली दिसून येते.

**१.३ लोकसंख्या भूगोलाचे महत्त्व** (Significance of Population Geography)

लोकसंख्या भूगोल ही एक अत्यंत महत्वाची मानवी भूगोलाची उपशाखा आहे. १८व्या शतकापासून मानवी भूगोलाच्या उदयाबरोबरच मानवास केंद्रस्थानी मानून अभ्यास करण्याची प्रवृत्ती भूगोलशास्त्रात वाढत चाललेली आहे. २०व्या शतकात तर त्यास अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. कोणत्याही देशाच्या किंवा प्रदेशाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासात लोकसंख्येला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. मानव हा सर्व सजीवांमध्ये सर्वश्रेष्ठ असा बुद्धिमान प्राणी असल्यामुळे मानवी समूहाचा एक महत्त्वपूर्ण साधनसंपत्ती म्हणून उपयोग केला जातो. त्यामुळेच या मूलभूत घटकास महत्त्व देऊन 1950 नंतर लोकसंख्या भूगोल ही नवीन शाखा उदयास आलेली आहे त्या शाखेचे महत्त्व पुढील मुद्द्याच्या द्वारे स्पष्ट करता येईल.

१. लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची जरी शाखा असली तरी ती मानवी भूगोलाच्या विकासास उपयुक्त ठरणारी अशी शाखा आहे.

२. लोकसंख्या भूगोलामध्ये लोकसंख्येच्या अभिक्षेत्रीय विश्लेषणाला जास्त महत्त्व असल्यामुळे अभिक्षेत्रीनुसार लोकसंख्येचे वितरण व स्वरूप समजण्यास मदत होते.

३. लोकसंख्येचे वितरण समजल्यामुळे एखाद्या प्रदेशांमध्ये  शासकीय योजना राबविण्यास मदत होते

४. आधुनिक काळात भूगोलामध्ये केवळ प्राकृतिक व सांस्कृतिक घटकाचे स्वरूप व त्याचे वितरण एवढाच अभ्यास मर्यादित राहिलेला नसून वितरणातील असमानतेमुळे जी प्रादेशिक भिन्नता निर्माण होते त्या पाठीमागील कारणकार्यकारणभावाचे योग्य आकलन होण्यासाठी लोकसंख्या भूगोलाचा अभ्यास उपयुक्त ठरत असतो.

५. लोकसंख्या भूगोलामध्ये मानवी समूहाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास (मृत्युदर, स्थलांतर, व्यवसायिक रचना, शिक्षण, आरोग्य, धर्म,भाषा, शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान इत्यादी) प्रादेशानुसार केला जात असल्यामुळे त्या त्या प्रदेशातील मानवाने सभोवतालच्या पर्यावरणाशी कशाप्रकारे समायोजन केलेले आहे याचे आकलन होण्यास मदत होते.

६. वेगवेगळ्या प्रदेशात राहणारी लोकसंख्या व त्या ठिकाणी असणारी साधनसंपत्ती यांच्याशी मानवाने केलेले समायोजन ध्यानात येते

७. लोकसंख्या भूगोलामध्ये लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येची वाढ, जन्मदर, मृत्युदर, रचना स्थलांतर, लिंग गुणोत्तर ,शिक्षण, आरोग्य इत्यादी घटकांचा अभ्यास अभिक्षेत्रीनुसार केला जात असल्यामुळे या शास्त्राच्या माध्यमातून जी माहिती उपलब्ध होते त्या माहितीचा उपयोग मानवी साधनसंपत्तीच्या विकासाचे नियोजन व लोकसंख्येचे धोरण निश्चित करण्यासाठी होत असतो

८. लोकसंख्येच्या अभ्यासावरून लोकसंख्या वाढ समजते एखाद्या देशांमध्ये लोकसंख्या वाढ जास्त होत असेल तर ते कमी करण्यासाठी कायदे करतात किंवा एखाद्या देशांमध्ये लोकसंख्या कमी असेल तर लोकसंख्या वाढीसाठी योजना राबवतात

९. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे नियोजन करण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्ती बरोबर मानवी साधनसंपत्तीला जास्त महत्त्व प्राप्त आहे. मानवाची सांस्कृतिक, शास्त्रीय व तांत्रिक प्रगती जाणून घेऊन त्यानुसार पर्यावरणाचे संतुलन ढळू न देता आर्थिक विकास साध्य करण्यासाठी मानव संसाधनाची प्रदेशानुसार

समग्र माहिती असणे आवश्यक असते त्यासाठी लोकसंख्या भूगोलाचा अभ्यास उपयुक्त ठरतो कारण या शास्त्र मधून लोकसंख्येच्या विविध गुण वैशिष्ट्यांची माहिती प्राप्त होत असते.

१०. लोकसंख्येच्या अभ्यासावरून उद्योगधंद्याच्या स्थानिकीकरण व एखादा व्यवसाय स्थापन करण्यास मदत होते

११. लोकसंख्येची सांख्यिकीय माहिती प्राप्त होण्यासाठी प्रत्येक देशांमध्ये जनगणना घेतली जाते. या जनगणनेच्या अभ्यासावरून देशाची प्रगती मोजली जाते

१२. लोकसंख्येच्या अभ्यासावरून आपापल्या देशांमध्ये बाल, तरुण, प्रौढ, वृद्ध, लोकसंख्या समजते त्या लोकसंख्येचे वितरण समजल्यामुळे भविष्या मधील योजना आखण्यासाठी मदत होते

१३. लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासामुळे विविध प्रदेशातील मानवी जीवनाची माहिती प्राप्त होत असते. त्या प्रदेशातील अनुकूल घटक, प्रतिकूल घटक, त्यामधून निर्माण होणाऱ्या उणिवा आणि समस्यांचे (उदाहरणार्थ उपासमार, बेरोजगारी, दारिद्रय, निवास, शिक्षण व आरोग्यविषयक अपुऱ्या सुविधा इत्यादी) आकलन होण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरतो. या माहितीचा उपयोग समस्येचे निराकरण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

१४. लोकसंख्या ही एक मानवी साधन संपत्ती आहे या साधनसंपत्तीला आकार देण्याचे काम त्या देशातील सरकारचे असते. फक्त लोकसंख्या जास्त असून चालत नाही तर त्या लोकसंख्येला विकसित करण्याचे काम त्या देशाचे महत्वाचे असते तरच त्या देशाची विकसित राष्ट्रांमध्ये गणना केली जाते.

१५. भूगोल शास्त्रातील समग्रतेची (Totality) कल्पना साकार करण्यासाठी लोकसंख्या भूगोलाचा अभ्यास करणे आवश्यक नव्हे तर अपरिहार्य आहे

अशाप्रकारे लोकसंख्या भूगोलाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. कारण लोकसंख्येला एक संसाधन म्हणून पाहिले जाते. या संसाधनाचा जितका विकास केला जातो तितका त्या देशाचा विकास

होतो. म्हणूनच या मानवी लोकसंख्येला आकार देण्याचे काम त्या देशातील शासन करते. म्हणूनच लोकसंख्या कडे एक संसाधन म्हणून पाहावे लागेल.

**१.४. लोकसंख्या माहितीचे/सामग्रीचे, स्रोत (Sources of Population Data)**

लोकसंख्या भूगोलाचा अभ्यास करण्यासाठी लोकसंख्याविषयक सामग्रीची नितांत आवश्यकता असते. ही लोकसंख्येची सामग्री प्राथमिक, दुय्यम व तृतीय साधनाच्या आधारे गोळा केली जाते. ही लोकसंख्याविषयक सामुग्री जगातील कोणत्याही देशाला त्या देशाचा विकास करण्यासाठी, वेगवेगळ्या योजना आखण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी आवश्यक असते. ही आकडेवारी मिळवण्यासाठी विविध साधनाचा वापर केला जातो. त्या विविध साधनांच्या आधारे लोकसंख्याविषयक सामग्री किंवा आकडेवारी उपलब्ध केली जाते. त्या साधनांना लोकसंख्या सामग्रीचे उगमस्रोत म्हणतात. लोकसंख्या विषयक आकडेवारी किंवा सामग्री संकलित करण्याचे प्रमुख उगम स्रोत पुढील प्रमाणे

१. जनगणना (The Census)
२. जीवनावश्यक महत्त्वाच्या घटनांची नोंदणी (Registration of Vital Events or Vital Statistics)
३. लोकसंख्याशास्त्रीय नमुना सर्वेक्षण (Demographic Sample Surveys)
४. लोकसंख्या नोंदणी (Population Registers)
५. आंतरराष्ट्रीय प्रकाशने (International Publications)
६. दुहेरी नोंदणी पद्धत (Dual -Report System)
७. शासकीय व खाजगी नोंदी (Administrative & Private Registers)

**१.जनगणना (The Census)**

जनगणना हे लोकसंख्याविषयक आकडेवारी प्राप्त करण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. प्राचीन काळी केली जाणारी जनगणना व आज केली जाणारी जनगणना यात खूपच फरक आहे. प्राचीन काळी जास्त त्रुटी होत्या. जेव्हा गरज पडेल तेव्हाच जनगणना केली जात होती. त्यावेळी जनगणनेचा मुख्य उद्देश सैन्यभरती करणे, कर आकारणी करणे असा होता.

आधुनिक जनगणनेचे सर्वात पहिले उदाहरण म्हणजे 1790 मध्ये अमेरिकेत, ब्रिटन आणि फ्रान्स मध्ये प्रथम जनगणना सुरू झाली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत जवळजवळ संपूर्ण युरोप मध्ये ही व्यवस्था विकसित झाली होती. सद्यस्थितीत जगातील बहुतेक सर्व देश जनगणनेचे प्रतिनिधी आहेत. आज जनगणनेचे स्वरूप व्यापक बनले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) च्या अहवालात जनगणनेची व्याख्या पुढीलप्रमाणे केले आहे. "एखाद्या देशाच्या किंवा त्यातील सुनिश्चित भूभागाच्या एका विशिष्ट वेळेच्या लोकसंख्येविषयी व तिच्या आर्थिक आणि सामाजिक अंगाविषयी आकडेवारी गोळा करण्याच्या, तिचे संकलन करण्याच्या व ती प्रसिद्ध करण्याच्या संपूर्ण प्रक्रियेला जनगणना असे म्हणतात."

थोडक्यात एखाद्या देशातील एखाद्या विशिष्ट वेळी असलेल्या सर्व लोकांची जन्म,मृत्यू,व्यवसाय, सामाजिक आणि आर्थिक स्थिती याबाबतची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया म्हणजे जनगणना होय.

एका विशिष्ट वेळी संपूर्ण देशातील किंवा देशाच्या काही प्रदेशातील संपूर्ण लोकांची नियमितपणे केली जाणारी गणती म्हणजे जनगणना होय.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या (UNO) मार्गदर्शक तत्त्वानुसार एक १० वर्षांनी व त्यालगतच्या वर्षात जनगणना केली जावी असे मान्य करण्यात आले आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर

लोकसंख्येची तुलना करणे व नियोजन करणे सुलभ होते. यामुळेच जगातील अधिकांश देशांमध्ये दर १० वर्षांनी जनगणना केली जाते. परंतु ग्रेट ब्रिटन, जपान, कोरिया या देशात मात्र दर ५ वर्षांनी जनगणना केली जाते. अधिकांश देशांमध्ये जनगणना करताना भौगोलिक स्थिती, लोकसंख्या, लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्ये, प्रवासाचे ठिकाण, व्यवसाय, स्थान, वय, लिंग, विवाहस्थळ, नागरिकता, कुटुंब प्रमुखाचे नाते, धर्म, भाषा, शिक्षण, व्यवसाय, आर्थिक स्थिती, उत्पन्न, आरोग्य सुविधा, लोकवस्तीचे प्रकार, मूलभूत सोयीसुविधा इत्यादी घटकांची माहिती जनगणना सर्वेक्षणाद्वारे प्रत्यक्षरीत्या गोळा केली जाते. याद्वारे प्राप्त माहितीचे वर्गीकरण करून त्याचा अहवाल प्रकाशित केला जातो. जागतिक स्तरावर प्रत्येक देशाचा जनगणना अहवाल ही द्वितीयक सामग्री उगम स्रोत म्हणून समजला जातो. या जनगणना अहवालाचा अभ्यासात व संशोधनात खूप फायदा होतो.

जनगणना अनेक कारणांसाठी घेतली जाते. सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रयत्न करण्यासाठी ती आवश्यकच ठरते. आरोग्य, साक्षरता, शिक्षण, उत्पन्न, राहणीमान, अन्नपुरवठा, कृषिउत्पादन, औद्योगिक उत्पादन इ. क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याचा योजना आखण्यासाठी बऱ्यांच विविध माहितींची आवश्यकता असते. मतदान पद्धतीने लोकप्रतिनिधी निवडणे व कल्याणकारी राज्यातील सुविधांचे योग्य वाटप करणे, यांसाठीही जनगणेतील माहिती उपयोगी पडते.

उद्योगपती व व्यापारी जनगणनेच्या आधारे आपापल्या व्यवसायांचे योग्य नियोजन करू शकतात. शिवाय आर्थिक, सामाजिक व लोकसंख्येविषयी प्रश्नांवर संशोधन करणाऱ्यांना जनगणनेमधून उपलब्ध होणारी माहिती अनेक दृष्टींनी उपयुक्त असते. म्हणूनच जनगणनेला संशोधनाचे आणि प्रशासनाचे एक बहुउद्देशीय साधन मानले जाते.

भारतात जनगणना अहवाल एक मुख्य माहितीचा स्रोत आहे. भारतात सर्वप्रथम १८७२ मध्ये जनगणना करण्यात आली. आधुनिक पद्धतीने १८८१ मध्ये संपूर्ण भारताची जनगणना करण्यात आली होती.

**२. महत्त्वाच्या घटना किंवा महत्वाची आकडेवारी नोंदणी (Registration of Vital Events or Vital Statistics)**

जन्म, मृत्यू, विवाह, घटस्फोट, वेगळेपणा (separations), रद्द करणे (annulment) आणि दत्तक (adoption) घेण्यासारख्या महत्वाच्या घटनांविषयीची आकडेवारी महत्त्वपूर्ण आकडेवारी (vital statistics) म्हणून ओळखली जाते. अशा डेटाचे सतत रेकॉर्डिंग महत्त्वपूर्ण नोंदणी प्रणाली किंवा नागरी नोंदणी प्रणाली (vital registration system or civil registration system) म्हणून ओळखले जाते.

1836 मध्ये इंग्लंड आणि वेल्स (England and Wales) आणि 1854 मध्ये स्कॉटलंडमध्ये प्रथम नागरी नोंदणी प्रणाली (first civil registration system) लागू केली गेली. ब्रिटनपूर्वीही, स्वीडनमध्ये, लोकसंख्येच्या सारणीबद्ध नोंदी बनविण्याचा कायदा 1748 मध्ये लवकर अस्तित्त्वात आला होता. या कायद्यात प्रत्येक तेथील रहिवाशांसाठी जन्म, मृत्यू तसेच इतर सहाय्यक माहितीच्या नियमित नोंद ठेवण्याची तरतूद आहेतर खरं ., स्कॅन्डिनेव्हियन देशांमध्ये, अठराव्या शतकाच्या मध्यापासून जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदविण्याची व्यवस्था आहे.

महत्वाच्या घटनांबरोबरच (vital events) महत्वाची आकडेवारीदेखील (vital statistics) बरीच, इतर सहायक माहिती देखील प्रदान करते. जन्माच्या बाबतीत, उदाहरणार्थ, बाळाचे लैंगिक संबंध, आईचे वय, तिच्या आधीच्या मुलांची संख्या, जन्माचा क्रम, आई-वडिलांचे निवास

इत्यादीबद्दलही अतिरिक्त माहिती नोंदविली जाते. त्याचप्रमाणे मृत्यूच्या बाबतीत, मृत्यूची तारीख व मृत्यूची माहिती, लिंग, वय आणि मृताचे व्यवसाय आणि मृत्यूचे कारण याची नोंद आहे.

कोणत्याही देश किंवा प्रदेशातील लोकसंख्येच्या गतीशीलतेचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण आकडेवारी (vital statistics) महत्त्वपूर्ण साधन आहे. तथापि, जनगणनेच्या आकडेवारीच्या बाबतीतही नमूद केले आहे की जगातील बयाच बऱ्याच भागात विशेषतः भारत यासह विकसनशील देशांमध्ये महत्वाची आकडेवारी(vital statistics) चुकीची आहे. विकसनशील देशांपैकी बऱ्याच देशांमध्ये अद्यापही महत्त्वपूर्ण कार्यक्रमांची नोंद नोंदवण्याची व्यवस्था नाही.

भारतात 1886 पासून ब्रिटिश सरकारने नोंदणी पद्धत अमलात आणली. जन्म, मृत्यू ,विवाह ची नोंदणीची प्रभावी कार्यकारी स्वातंत्र्यानंतर होऊ लागली. 1960 नंतर नोंदणी खाते रजिस्टार जनरल कडे सोपविण्यात आले. या विभागातर्फे भारतात दरवर्षी Vital Statistics of India हे पुस्तक प्रकाशित केले जाते. त्यात जीवनाविषयक महत्त्वाच्या घटनांची नोंद असते 1969 साली भारतात या प्रकारच्या नोंदणी संदर्भात जन्म, मृत्यू नोंदणी कायदा मंजूर केला गेला.

**३.लोकसंख्याशास्त्रीय नमुना सर्वेक्षण (Demographic Sample Surveys)**

लोकसंख्याशास्त्रीय नमुना सर्वेक्षण लोकसंख्या डेटाचा आणखी एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. नमुना सर्वेक्षणात डेटा निवडलेल्या नमुन्यांमधून मिळविला जातो आणि नमुन्यांच्या आकाराचे नियमन करून डेटामध्ये सांख्यिकीय त्रुटीची मर्यादा कमी केली जाते. प्राप्त केलेल्या डेटाचे अनेक उपयोग आहेत जसे की पूर्वी काही काळ घेतलेल्या पूर्ण मोजणीचे निकाल अद्ययावत करणे, अचूकता तपासणे आणि सध्याच्या संपूर्ण मोजणीचा डेटा पूरक करणे इ.

नमुना सर्वेक्षणांद्वारे डेटा संग्रहित करणे अधूनमधून पूर्ण मोजण्यापेक्षा बरेच फायदे आहेत यासाठी . कमी संख्येने कर्मचारी किंवा मुलाखत घेणारे आवश्यक आहेत आणि अशा प्रकारे हे कमी खर्चिक आहे

च्या आणि योग्यरित्या डिझाइन केलेल्या प्रश्नावलींच्या मदतीने नमुनेअधिक कुशल मुलाखतकारां . सर्वेक्षणांद्वारे काही विशिष्ट विषयांची तपशीलवार माहिती मिळविली जाऊ शकते, जी सर्वसाधारणपणे पूर्ण कालावधीत शक्य नसतेपुढे .नमुना सर्वेक्षणातून प्राप्त केलेला डेटा अधिक विश्वासार्ह आहे ., नमुने सर्वेक्षण अधिक वेळा केले जाऊ शकते आणि विचारले जाणारे प्रश्न वेळोवेळी बदलू शकतात.

**४.लोकसंख्या नोंदणी (Population Registers)**

स्कँडिनेव्हियन देशांमध्ये आणि नेदरलँड्स, बेल्जियम आणि फिनलँड सारख्या काही इतर युरोपियन देशांमध्ये स्थानिक नोंदणी ब्यूरो (local registration bureaus) रजिस्टर ठेवतात ज्यात प्रत्येक व्यक्तीविषयी तपशील सतत नोंदवले जातात. या नोंदी लोकसंख्या नोंदणी म्हणून ओळखल्या जातात आणि त्या लोकसंख्येमध्ये होणाऱ्या बदलांची सर्वसमावेशक माहिती देतात. या प्रणालीमध्ये, प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र जन्म तिच्या जन्माच्या काळापासून (किंवा कायमचे वास्तव्य करण्यासाठी परदेशातून येणे) त्याच्या मृत्यूपर्यंत (किंवा स्थलांतरित) केले जाते. या प्रणालीमागील प्राथमिक उद्दीष्ट म्हणजे व्यक्तींची ओळख प्रस्थापित करणे आणि त्यांच्यावर दक्षता ठेवणे होय.

सतराव्या शतकात या प्रणालीची सुरुवात करणारा स्वीडन पहिला देश असल्याचे म्हटले जाते. हे स्पष्ट आहे की उच्च पातळीवरील संस्कृती असलेल्या लहान लोकसंख्येसाठी लोकसंख्या नोंद अधिक कार्यक्षमतेने ठेवली जाऊ शकते. या व्यवस्थेचा एक तोटा देखील आहे की या प्रमाणे तपशीलवार नोंदवलेली नोंद स्वतंत्रतेचे उल्लंघन करू शकते.

**५.आंतरराष्ट्रीय प्रकाशने (International Publications)**

संयुक्त राष्ट्र आणि विविध संस्था, (जागतिक बँक सारख्या इ.) आंतरराष्ट्रीय एजन्सीसमवेत संपूर्ण जगासाठी आणि वेगवेगळया देशांसाठी स्वतंत्र अंतरावरील लोकसंख्या डेटा नियमित अंतराने प्रकाशित करते. त्यातील काही आंतरराष्ट्रीय महत्वाची प्रकाशने पुढील प्रमाणे

**लोकसंख्याशास्त्रीय वार्षिक पुस्तके (Demographic Year Book)**

युनायटेड नेशन्स (United Nations) लोकसंख्याशास्त्रीय वार्षिक पुस्तक विविध विषयांवर अधिकृत आकडेवारी संकलित आणि प्रसारित करते. हे पुस्तक 1948 पासून दरवर्षी प्रकाशित केले जाते. यामध्ये विविध देशांमधील लोकसंख्या विषयक आकडेवारी दिलेली असते उदाहरणार्थ लोकसंख्या आकार आणि रचना, जन्म, मृत्यू, विवाह आणि घटस्फोटाची आकडेवारी इत्यादी विस्तृत विषयांची माहिती देते.

**संख्याशास्त्रीय वार्षिक पुस्तके (Statistical Year Book)**

हे पुस्तक राष्ट्रीय स्तरावर वर्षातून एकदा प्रकाशित होते त्यात लोकसंख्येच्या विविध अंगाबाबतची माहिती प्रकाशित केली जाते उदाहरणार्थ श्रमशक्ती, राष्ट्रीय उत्पन्न, ऊर्जा उपभोग, खाद्य उत्पादन, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा इत्यादी

**जागतिक आरोग्य संघटनेतर्फे प्रकाशित मासिके (Epidemiological & Vital Records)**

हे मासिक जागतिक आरोग्य संघटनेतर्फे प्रकाशित केले जाते त्यात निरनिराळ्या देशातील आरोग्यविषयक माहिती प्रसिद्ध केली जाते.

**जागतिक बँकेचा अहवाल** (World Bank Report)

जागतिक बँक आपल्या वार्षिक जागतिक विकास अहवालात विविध लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक आणि आर्थिक बाबींचा डेटा देखील प्रकाशित करते.

**अन्न व कृषी वार्षिक पुस्तक (Year Book of food and agriculture)**

या प्रकाशनात कृषी लोकसंख्येची माहिती दिली जात आहे.

**कामगार आकडेवारीचे वार्षिक पुस्तक (Yearbook of Labour Statistics)**

या प्रकाशनात आर्थिकदृष्ट्या सक्रिय लोकसंख्येविषयी विस्तृत माहिती देण्यात आली आहे.

तसेच, युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम )United Nations Development Programme ( देखील आपल्या वार्षिक मानव विकास अहवालात (annual Human Development Report) जगासाठी आणि विविध देशांकरिता विविध सामाजिक, आर्थिक आणि लोकसंख्याविषयक बाबींचा डेटा प्रकाशित करतो

अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय विविध प्रकाशना द्वारे लोकसंख्याविषयी माहिती गोळा केली जाते.

**६.दुहेरी नोंदणी पद्धत (Dual -Report System)**

बहुतेक विकसनशील राष्ट्रांमध्ये लोकसंख्याविषयक नोंदीमध्ये दोष आढळतात  नोंदणी पद्धतीत सुधारणा होऊन विश्वसनीय आकडेवारी मिळवणे आवश्यक आहे यासाठी दुहेरी नोंदणी पद्धत अमलात आणली जाते भारत-पाकिस्तान तुर्कस्तान थायलंड कोलंबिया मोरॉक्को फिलिपाइन्स या देशांमध्ये दुहेरी नोंदणी पद्धतीचा उपयोग केला जातो

या पद्धतीनुसार जन्म-मृत्यू विषयक प्रत्येक घटनेची नोंद दोन निरनिराळ्या संघटनांमार्फत स्वतंत्ररीत्या केली जाते के म्हणजे जन्म-मृत्यू नोंदणी व दुसरी म्हणजे नमुना सर्वेक्षण पद्धत होय. दोन्ही पद्धतीद्वारे स्वतंत्रपणे आकडेवारी मिळवल्यानंतर त्या पडताळून पाहिल्या जातात व काही चुका असल्यास त्यात मेळ घालून त्या दुरुस्त केल्या जातात काही काही घटनांची नोंदणी केली जात नाही किंवा कोणत्यातरी एकाच पद्धतीत नोंद केली जाते अशा वेळी नोंदणी न झालेल्या घटनांच्या संख्येचा अंदाज घेण्यासाठी चंद्रशेखर डेमिंग यांनी सुचवलेल्या सूत्राचा वापर केला जातो

दुहेरी नोंदणी पद्धतीत दोन वेगवेगळ्या पद्धतीने जन्म मृत्यू व इतर घटनांची नोंदणी केली जात असल्यामुळे त्याची पडताळणी करून त्यात मेळ घातला जातो त्यामुळे उपलब्ध होणारी माहिती विश्वसनीय असू शकते.

**७.शासकीय व खाजगी नोंदी (Administrative & Private Registers)**

यात खाजगी स्वरूपात लिहून ठेवलेली माहिती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्तरावर प्रकाशित होणारी लोकसंख्या विषयक माहितीचा समावेश होतो

**राष्ट्रीय स्तरावरील शासकीय उगमस्त्रोत**

सेवा नोंदणी सेवायोजन कार्यालयातील नोंदीशी स्थलांतर नोंदणी राज्यस्तरावरील सांख्यिकीय सारांश जन्म मृत्यू व विवाहाच्या नोंदी प्रशासकीय कागदपत्रे आरोग्य व कुटुंब कल्याण कार्यालयातील नोंदी काम का कामगार कल्याण व विकास खात्याच्या नोंदी विद्यापीठे व संशोधन संस्थेतर्फे प्रकाशित संशोधन पत्रिका पत्रके व इतर प्रकाशने राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण इत्यादी नोंदीवरून लोकसंख्या विषयक विविध घटकांची आकडेवारी उपलब्ध होते

**आंतरराष्ट्रीय स्तरावरील उगम सुरुवात उगम स्रोत**

संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे प्रकाशित डोमो ग्राफिक येअर्बूक अन्न व शेती संघटना आंतरराष्ट्रीय कामगार संघटना जागतिक आरोग्य संघटना इं मोस्को राष्ट्र संयुक्त राष्ट्र लोकसंख्या कार्यक्रम निधी युनूस ॲप इत्यादी संघटनेचे अहवाल पत्रिके व ग्रंथाद्वारे लोक सिंग लोकसंख्या विषयक माहिती उपलब्ध होते

याशिवाय इतर प्रशासकीय कागदपत्राद्वारे ही बरीचशी माहिती मिळवता येते शाळा महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचे नाव वय पालकांचे नाव व्यवसाय तर शिधापत्रिकेत नाव वय लिंग भेद कुटुंब प्रमुखाची नाते इत्यादी माहिती दिलेली असते याच प्रकारे मतदार याद्या विमानतळ व बंदराच्या ठिकाणी केलेल्या केलेल्या अधिकृत नोंदी यावरून लोकसंख्या विषयक माहिती प्राप्त होऊ शकते